सन २०१८च्या खरीप हंगामात दुष्काळ जाहीर झालेल्या गावांमध्ये पीक कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.१४१/१८-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१९

वाचा - १) शासन निर्णय - महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दि.२३.१०.२०१८.
२) शासन निर्णय - महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दि.३१.१०.२०१८.
३) भारतीय रिझर्व बँकेचे मास्टर निर्देश आरबीआय/एफआयडीडी/२०१८-१९, दि.१७.१०.२०१८.
४) शासन निर्णय - महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दि. ६.११.२०१८.
५) शासन परिपत्रक- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.१४१/ १८-स, दि.१९ डिसेंबर, २०१८.
६) शासन निर्णय - महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.२१६/म-७, दि. ८.१.२०१९.
७) शासन निर्णय - महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.२१६/म-७, दि. २१.२.२०१९.

शासन परिपत्रक :-

वरील वाचा येथील महसूल व वन विभागाच्या अ.क्र.१,२,४,६,व ७ येथील शासन निर्णयान्वये त्या सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या गावांत तालुक्यांत दुष्काळ जाहीर करून सवलती लागू करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

उपरोक्त नमूद अ.क्र. १,२,४,६, व ७ येथील शासन निर्णयांमध्ये जाहीर केलेल्या सवलती उपाययोजनांमध्ये १) सहकारी कर्जाचे पुनर्गठन व २) शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती अशा सहकार विभागाशी संबंधित सवलती/ उपाययोजनांचा समावेश आहे.

२. महसूल व वन विभागाच्या वरील अ.क्र. १,२, व ४च्या निर्णयांच्या अनुषंगाने व भारतीय रिझर्व बँकेच्या दि. १७.१०.२०१८ च्या निर्देशांतील सूचनांच्या आधारे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक दि. १९.१२.२०१९ अन्वये खरीप-२०१८ मधील कर्जाच्या वसुलीस दि.३१.१०.२०१९ पर्यंत स्थगिती देण्याबाबत तसेच अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात (कालावधी ५ वर्षे) पुनर्गठन करण्यास मान्यता देण्यात आली आहे व याअनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे.

३. महसूल व वन विभागाच्या वरील अ.क्र. ६ व ७ येथील शासन निर्णय दि. ८.१.२०१९ व दि.२१.२.२०१९ अन्वये दुष्काळ जाहीर केलेल्या गावांतही सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक दि.१९.१२.२०१९ मधील सूचनांप्रमाणेच सन २०१८ मधील खरीप पीक कर्जाच्या वसुलीस दि. ३१.१०.२०१९ पर्यंत स्थगिती देण्याबाबत तसेच अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात (कालावधी ५ वर्षे) पुनर्गठन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुलभ संदर्भासाठी उपरोक्त दि.८.१.२०१९ व दि.२१.२.२०१९ च्या शासन निर्णयांची परिशिष्टे यासोबत जोडली आहेत, संदर्भाधीन शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

४. खरीप-२०१८ हंगामातील पीक कर्जाच्या परतफेडीचा दिनांक ३१ मार्च,२०१९ असल्याने वरीलप्रमाणे बाधित गावातील जे शेतकरी विहीत मुदतीत पीक कर्जाची परतफेड करु शकणार नाहीत अशा शेतकऱ्यांची संमती घेऊन खरीप-२०१८ हंगामातील पीक कर्जाचे व्याजासह मध्यम मुदत कर्जात ५ वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्गठन करण्यात यावे.

खरीप-२०१८ मधील पीक कर्जाच्या पुनर्गठनाची कार्यवाही सर्व बँकांनी दि. ३१ जुलै, २०१९ पर्यंत पूर्ण करावी व अशा शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे. या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी कटाक्षाने करण्यात येईल याची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०३०८१११०२४२२०२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: CN = Ramesh Shankarrao Shingte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Cooperation, Marketing And Textile Department
Date: 2019.03.08 11:23:36 +05'30'

(रमेश शिंगटे)

अवर सचिव तथा सहनिबंधक, सहकारी संस्था,

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

२) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.

४) मा. विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य (सर्व).

५) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

७) आयुक्त, कृषी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
१०) जिल्हाधिकारी (सर्व).
११) सह सचिव, भारत सरकार, कृषी मंत्रालय (सहकार विभाग) कृषी भवन, नवी दिल्ली.
१२) महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशीक कार्यालय, पुणे.
१३) मुख्य अधिकारी, आर.बी. आय, ॲग्रिकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफीस, गारमेंट हाऊस, मुंबई-१८.
१४) उप मुख्य अधिकारी, आर.बी. आय, ॲग्रिकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफीस, गारमेंट हाऊस, मुंबई-१८.
१५) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१७) कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व).
१८) प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई.
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२०) सर्व कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती - २स /१८-स.

शासन निर्णय, क्रमांक: एससीवाय-२०१८/प्र.क्र.२१६/म-७, दिनांक: ८ जानेवारी, २०१९ चे

"परिशिष्ट -अ"

अ.क्र.	विभाग	जिल्हा	तालुका	महसूल मंडळे	या महसुल मंडळातील अंतिम पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी आलेल्या गावांची संख्या
१	नाशिक	धुळे	साक्री	ब्राह्मणवेल	३७
२				दुसाणे	१८
३				साक्री	१४
४				कासारे	१८
५				दहिवेल	२९
		एकूण धुळे			**११६**
६		अहमदनगर	अकोले	अकोले	२०
७				वीरगाव	१८
८				समशेरपूर	२५
९				कोतूळ	२९
१०				ब्राह्मणवाडा	२४
		एकूण अहमदनगर			**११६**
११		जळगाव	एरंडोल	एरंडोल	१८
१२				रिंगणगाव	१८
१३			धरणगाव	धरणगाव	१३
१४				साळवा	१५
१५				पाळधी	१८
१६				पिंप्री	१७
१७				चांदसर	९
		एकूण जळगाव			**१०८**
१८		परभणी	गंगाखेड	गंगाखेड	२०
१९			जिंतूर	सांगवी	३०
२०				बामणी	३०

		एकूण परभणी			८०
२१		जालना	मंठा	मंठा	२८
२२				ढोकसाळ	३०
		एकूण जालना			५८
२३		उस्मानाबाद	उमरगा	उमरगा	१७
२४				मुरुम	१७
२५				नारंगवाडी	१९
२६				मुळज	२२
२७				दांळिब	२१
		एकूण उस्मानाबाद			९६
२८	पुणे	सातारा	खटाव	निमसोड	१०
२९				मायणी	२५
३०				पुसेगांव	१०
३१				बुध	१६
३२				खटाव	१२
३३				औंध	१४
३४				पुसेसावळी	११
३५				कातरखटाव	१३
		एकूण सातारा			१११
३६	अमरावती	बुलडाणा	बुलडाणा	बुलडाणा	१८
३७				देऊळघाट	१४
३८				पाडळी	१७
३९				रायपूर	११
४०				धाड	१५
४१			चिखली	चिखली	१०
४२				उंद्री,	१६
४३				अमडापुर	११

४४				हातणी	१३
४५				मेरा	१०
४६			मेहकर	मेहकर	२०
४७				हिवराश्रम	२२
४८			देऊळगाव राजा	देऊळगाव मही	१४
४९			जळगाव जामोद	जळगांव	३२
५०				जामोद	२३
	एकूण बुलडाणा				**२४६**
	एकूण राज्य				**९३१**

परिशिष्ट-अ

शासन निर्णय,क्रमांक : एससीवाय-२०१८/प्र.क्र.२१६/म-७, दिनांक : २१ फेब्रुवारी , २०१९ चे सहपत्र

अ.क्र.	जिल्हा	५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी व अद्यापही दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित न केलेल्या गावांची सख्या
१	धुळे	५०
२	नंदूरबार	१९५
३	अहमदनगर	९१
४	नांदेड	५४९
५	लातूर	१५९
६	पालघर	२०३
७	पुणे	८८
८	सांगली	३३
९	अमरावती	७३१
१०	अकोला	२६१
११	बुलडाणा	१८
१२	यवतमाळ	७५१
१३	वर्धा	५३६
१४	भंडारा	१२९
१५	गोंदिया	१३
१६	चंद्रपूर	५०३
१७	गडचिरोली	२०८
	एकूण	**४५१८**